11 MAR 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकासकांक्षी नेतृत्वात बाळासाहेब देसाई अग्रणी

## शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात मान्यवरांचे मत

कोल्हापूर, ता. १० : 'महाराष्ट्राच्या १९६० ते १९८० च्या कालखंडातील विकासकांक्षी नेतृत्वात माजी गृहमंत्री दिवंगत बाळासाहेब देसाई यांचे नाव अग्रणी होते', असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात आज व्यक्त झाला.

माजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे 'महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व (१९६० ते १९८०)' विषयावर एकदिवसीय परिसंवाद झाला. त्यात ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरुण भोसले सहभागी झाले. कुलगुरू



कोल्हापूर : परिसंवादात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डावीकडून डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अरुण भोसले, डॉ. अवनीश पाटील.

डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात हा परिसंवाद झाला.

डॉ. चौसाळकर म्हणाले, '१९६० पूर्वी गुजरात, कच्छ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर कर्नाटकचा समावेश असलेल्या व्यापक व गुजराती, मराठी, कन्नड अशा त्रैभाषिक मुंबई राज्याचा पसारा होता. १९३० च्या आसपास महाराष्ट्रात काँग्रेसच्या बरोबरीने ब्राह्मणेतर, दलित, कामगार चळवळींचा उदय झाला. टिळकपंथी नेतृत्वाचा प्रभाव कमी होऊन तळागाळातील नेत्यांचा उदय झाला. शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे, केशवराव जेधे यांचा प्रभाव काँग्रेसमध्ये वाढला. १९३५च्या कायद्याने १९३६ ला मुंबई राज्य विधानसभेची निर्मिती झाली. १९३७ च्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेसला ७८ जागा मिळून बाळासाहेब खेर मुख्यमंत्री झाले. त्यानंतर १९४६ ला पुन्हा खेरच मुख्यमंत्री झाले. या सरकारवर १९५२ पर्यंत गुजराती मंत्र्यांचे वर्चस्व होते. त्यांचे कामकाज अतिशय निम्न दर्जाचे असून, त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होती. त्यातून संसाधनांचे वाटप आव्हानात्मक बनले होते.'

डॉ. भोसले म्हणाले, '१९६० ते १९८० या कालखंड महाराष्ट्राच्या भरभराटीचा होता. या दोन्ही दशकांवर यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव होता, तर बाळासाहेब देसाई त्यांचे उजवे हात होते. कृषी-औद्योगिकरणाच्या स्वीकाराने राज्यात सुरू झालेल्या सहकार चळवळीने ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलून गेला. साहित्य, संगीत, नाट्य, विविध कलांच्या ऊर्जितावस्थेचा हा काळ होता. लोकमान्य टिळक यांच्यानंतर राष्ट्रीय पातळीवर नावाजलेला नेता म्हणजे चव्हाण होत. त्यांचे देसाई यांच्याशी ऋणानुबंध होते.' समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

11 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# राज्याच्या विकासाकांक्षी नेतृत्वांत बाळासाहेब देसाई अग्रणी

## विद्यापीठात परिसंवादातील सूर : अध्यासनाच्या वतीने आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सन १९६० ते १९८० या कालखंडातील महाराष्ट्राचे राजकीय नेतृत्व विकासाकांक्षी होते. लोकनेते बाळासाहेब देसाई त्यामधील अग्रणी नाव होते, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष परिसंवादामध्ये सोमवारी उमटला.

महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत परिसंवाद झाला. यात ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे, डॉ. अशोक चौसाळकर आणि डॉ. अरुण भोसले सहभागी झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. डॉ. विजय चोरमारे म्हणाले, प्रचंड हालअपेष्टा सोसून आयुष्य घडविणाऱ्या देसाई यांनी राबविलेल्या ई.बी.सी. योजनेने शिक्षणव्यवस्थेचे चरित्र आणि चारित्र्य बदलून टाकले. या योजनेमुळे राज्यातील बहुजन समाजातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येण्यास मोलाची मदत झाली. डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, अभ्यास करण्याची, अथक परिश्रम करण्याची तयारी असणाऱ्या या नेतृत्वाला जनतेच्या प्रश्नांचीही जाण होती. डॉ. अरुण भोसले यांनी १९६० ते १९८० या कालखंडावर यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव होता, तर बाळासाहेब देसाई त्यांचे उजवे हात होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षणव्यवस्थेकडे ते सर्जनशील संवेदनशीलतेने पाहत होते. यावेळी डॉ. अवनीश पाटील, प्रांजली क्षीरसागर, डॉ. दत्तात्रय मचाले उपस्थित होते.



लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष परिसंवादात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. शेजारी विजय चोरमारे, अशोक चौसाळकर, अरुण भोसले, अवनीश भोसले उपस्थित होते.

11 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी समस्या सोडविणारे : डॉ. पी. एस. पाटील

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्वत्र होत असून, ते वर्तमानकाळ आणि भविष्यकाळातील समस्या सोडवणारे आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये झालेल्या परिसंवादात ते बोलत होते. 'कृत्रिम बुद्धिमत्ता उच्च शिक्षणातील बदल, नवनिर्मिती आणि बहुउद्देशीय दृष्टिकोन'या विषयावर हा परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम होत्या.

डॉ. पाटील म्हणाले, 'जगातील सर्वच देश कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत आहेत. चीनसारखा देश तर या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापर करून जगामध्ये महासत्ता होत आहे. त्यामुळे भारतातील जास्तीतजास्त लोकांनी या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आपली प्रगती करावी.'

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. माधव भिलावे यांनी बीजभाषण केले. डॉ. कबीर खराडे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठीची साधने' या विषयावर संवाद साधला. केआयटी कॉलेजचे प्रा. डॉ. महेश शिंदे, शहाजी लॉ कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील आदींचा सहभाग होता. कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली समारोप झाला. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, ॲड. अमित वाडकर, ॲड. वैभव पेडणेकर, उद्योजक भाविक देशपांडे, प्रमोद जगताप, पार्वतीदेवी कुंभार कॉलेजचे प्राचार्य डॉ. भालचंद्र कुलकर्णी आदी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. सुप्रिया चौगले यांनी स्वागत केले. डॉ. ताहीर झारी यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य कॅप्टन डॉ. आर. एस. नाईक यांनी आभार मानले. सहसमन्वयक डॉ. एस. एस. देसाई, डॉ. एन. एच. जाधव, डॉ. एस. एफ. बोथीकर आदींनी संयोजन केले.

11 MAR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहास संशोधनासाठी प्रत्येक संदर्भ महत्त्वपूर्ण

## डॉ. अवनिश पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

इतिहास संशोधनासाठी प्रत्येक संदर्भ महत्त्वपूर्ण ठरतो. आजच्या वर्तमान काळातील टिपण्या, लेखन व संकलन भविष्यातील इतिहास संशोधनाचे संदर्भ- दस्तावेज ठरू शकतात, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी व्यक्त केला.

भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. कोल्हापूर जिल्ह्याच्या निर्मितीला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'कोल्हापूर जिल्ह्याची अमृत महोत्सवी वाटचाल १९४९ ते २०२५' असा चर्चासत्राचा विषय होता.

प्राचीन इतिहासाचे अभ्यासक उमाकांत राणिंगा व मूर्ती अभ्यासक ॲड. प्रसन्न मालेकर यांनी लिहिलेल्या 'करवीर निवासिनी महालक्ष्मी' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे यांनी चर्चासत्राची भूमिका सांगितली. सचिव डॉ. आरेन हर्डीकर यांनी जिल्ह्याच्या भौगोलिक व सामाजिक वाटचालीचा आढावा घेतला. प्राचार्य डॉ. व्ही. एस. पवार यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या निर्मितीच्या संदर्भातील तपशील सांगितले.

**विविध विषयांवरील शोधनिबंधांचे वाचन**

डॉ. वंदना पुसाळकर यांनी 'जयंती नाला, नव्हे नदीच' यावर विचार मांडले. डॉ. राजश्री निकम यांनी 'दलितमित्र बापूसाहेब पाटील' यांचा परिचय करून देणाऱ्या शोधनिबंधाचे वाचन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. केशव हरेल, हर्षदा कदम, डॉ. श्वेतलीना पाटील, योगशिक्षिका मनीषा शिंदे, प्रियंका पाटील यांनी शोधनिबंध सादर केले.

डॉ. नीला जोशी यांनी 'करवीर महाराणी जिजाबाई यांची राजकीय भूमिका' या शोधनिबंधाचे वाचन केले. किशोर दीक्षित, ॲड. मालेकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी इतिहासप्रेमी, संशोधक, अभ्यासक उपस्थित होते.

11 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरस्थ शिक्षणातून महिलांना करिअरच्या वैविध्यपूर्ण संधी

## डॉ. भारती पाटील : सक्षमीकरणासाठी शिक्षण हे वाघिणीचे दूध

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : 'दूरस्थ शिक्षणातून महिलांना करिअरच्या वैविध्यपूर्ण संधी उपलब्ध झाल्या आहेत', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे ऑनलाईन एमबीए युनिटतर्फे 'दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणातील महिलांसाठी करिअरच्या संधी' या विषयावरील आयोजित ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. जागतिक महिला दिनानिमित्त त्याचे आयोजन केले होते. प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते.



डॉ. पाटील म्हणाल्या, 'महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. त्यासाठी शिक्षण अपूर्ण राहिलेल्या महिलांनी पुन्हा शिक्षण घेऊन रोजगाराभिमुख व्हावे. त्यांनी स्वविकासातून समक्षीकरणाचा विचार करायला हवा.' डॉ. पाटील यांनी भारतीय शिक्षण व्यवस्था, महिलांची आजची स्थिती, जीवनातील ध्येयाचे महत्त्व, मल्टिटास्किंग, दूरशिक्षणामुळे महिलांना होणारा फायदा व विविध नोकरींतील वाव, जागरूकता व घरच्या जबाबदाऱ्या यावर मार्गदर्शन केले.

डॉ. के. बी. पाटील यांनी महिलांकडे व्यक्तिगत व घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून जीवनाचा समतोल साधण्याची प्रभावी कला असल्याचे सांगितले. यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, समन्वयक डॉ. सी. ए. बंडगर उपस्थित होते. सुप्रिया मोगले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नगिना माळी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. केतकी पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ येथील शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या औचित्याने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

कार्यशाळा १२ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृह, शिवाजी विद्यापीठ येथे होणार आहे. कार्यशाळेचा मुख्य विषय 'भारतीय महिला : जात-वर्ग-लिंगभाव जाणीव' आहे. प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त के. मंजुलक्ष्मी उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. ई. एफ. एल. युनिव्हर्सिटी, हैदराबादच्या माजी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. माया पंडित व सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटक, गुलबर्गा येथील प्रा. डॉ. शिवगंगा रूम्मा कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक असतील. व्याख्यानासोबतच महिलाविषयक निवडक आंतरराष्ट्रीय लघुपटांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. उमेश मालन दिग्दर्शित 'गोल्डन टॉयलेट' हा मराठी लघुपट, फजिल रझाक दिग्दर्शित 'पिरा' हा मल्याळम लघुपट तसेच समता जाधव दिग्दर्शित 'सोच सही, मर्द वही' हा हिंदी लघुपट दाखविण्यात येणार आहे. लघुपटांविषयी डॉ. अनमोल कोठाडिया उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शरण साहित्य अध्यासन समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, विवेक वाहिनी, कोल्हापूरच्या जिल्हा कार्यवाह डॉ. चैत्रा राजाज्ञा यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2025
लोकमत

# शरण अध्यासनातर्फे उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथील शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभागतर्फे उद्या, बुधवारी (दि. १२) महिला दिनाच्या औचित्याने भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृहात कार्यशाळा होईल. 'भारतीय महिला : जात-वर्ग-लिंगभाव जाणीव' हा विषय असेल. प्रशासक के. मंजूलक्ष्मी प्रमुख पाहुण्या, कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. ईएफएल युनिव्हर्सिटीच्या माजी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. माया पंडित आणि सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटकाचे प्रा. डॉ. शिवगंगा रुम्मा प्रमुख मार्गदर्शक असतील, अशी माहिती डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2025
सकाळ

# शरण अध्यासनातर्फे उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभाग व विवेक वाहिनीच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (ता. १२) आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त एकदिवसीय कार्यशाळा होत आहे. भौतिकशास्त्र अधिविभागात सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत कार्यशाळा होईल. 'भारतीय महिला : जात-वर्ग-लिंगभाव जाणीव' विषयावर कार्यशाळा आहे. यावेळी महिलाविषयक निवडक आंतरराष्ट्रीय लघुपटांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. उमेश मालन दिग्दर्शित 'गोल्डन टॉयलेट' मराठी, फजिल रझाक दिग्दर्शित 'पिरा' मल्याळम्, समता जाधव दिग्दर्शित 'सोच सही, मर्द वही' हा हिंदी लघुपट दाखविण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात १२ रोजी शरण अध्यासनातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ येथील शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा उद्या (दि. १२) सकाळी १० वाजता भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृहात होणार आहे. 'भारतीय महिला : जात–वर्ग–लिंगभाव जाणीव' हा विषय आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवतील. हैद्राबाद येथील ई.एफ.एल. युनिव्हर्सिटिच्या माजी प्र–कुलगुरू डॉ. माया पंडित आणि गुलबर्गा येथील सेंट्रल युनिव्हर्सिटि ऑफ कर्नाटकाचे डॉ. शिवगंगा रूम्मा प्रमुख मार्गदर्शक असतील. या कार्यशाळेला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी डॉ. चैत्रा राजाज्ञा यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 1 MAR 2025
सकाळ

# विद्यापीठात उद्यापासून पोर्तुगीज चित्रपट महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व द कमॉइश इन्स्टिट्यूटतर्फे (लिस्बन, पोर्तुगाल) १२ व १३ मार्चला पोर्तुगीज चित्रपट महोत्सव होत आहे. वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी हॉलमध्ये दुपारी दोन ते सहा या वेळेत चित्रपटांचे प्रदर्शन होईल. विदेशी भाषा विभाग व द कमॉइश इन्स्टिट्यूट यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सांस्कृतिक अदान-प्रदानाचा भाग म्हणून महोत्सव होत आहे. यात द ब्लू ॲपल्स (२०२३), पुरेजा (२०२२), साल्गेइरू माइया – द इम्प्लिकेटेड, पोर्टो प्रिन्स (२०२३) हे चित्रपट दाखविले जाणर आहेत. महोत्सव सर्वांसाठी खुला आहे, तरी विद्यार्थी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विदेशी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2025
पुण्यनगरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**जागतिक महिला दिनानिमित्त कोल्हापूर जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात आले.**

## ‘शिक्षणशास्त्र’अधिविभाग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मानसोपचारतज्ज्ञ आम्रपाली रोहिदास होत्या. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे होत्या. रोहिदास म्हणाल्या, महिलांनी शारीरिकदृष्ट्या सक्षम असण्याबरोबरच मानसिकदृष्ट्याही सक्षम असणे काळाची गरज आहे. यावेळी महाराष्ट्र शासनाचा बालस्नेही पुरस्कारप्राप्त मीना कलकुंद्रे भाले यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, आनंदा कुंभार, अर्चना कुराडे, अंजली गायकवाड, विनया कांबळे व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले. सूत्रसंचालन भाग्योदय कांगोणे व सुषमा संकपाळ यांनी केले. आभार योगेश कुमार यांनी मानले.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# महाराष्ट्राच्या विकासाकांक्षी नेतृत्वात लोकनेते बाळासाहेब देसाई अग्रणी

## शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादातील सूर

**कोल्हापूर, ( महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज)**

सन १९६० ते १९८० या कालखंडातील महाराष्ट्राचे राजकीय नेतृत्व विकासाकांक्षी होते आणि लोकनेते बाळासाहेब देसाई त्यामधील अग्रणी नाव होते, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या विशेष परिसंवादामध्ये उमटला.

महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री, बांधकाम मंत्री, गृहमंत्री म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त आज (दि. १०) शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व (१९६० ते १९८०) या विषयावरील एकदिवसीय परिसंवाद झाला. परिसंवादामध्ये ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे, ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर आणि ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरुण भोसले सहभागी झाले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

'लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे राजकीय नेतृत्व' या विषयाच्या अनुषंगाने बोलताना डॉ. विजय चोरमारे यांनी देसाई यांच्या सुरवातीच्या कालखंडातील खडतर आयुष्याविषयी माहिती दिली. अत्यंत कष्टाने, प्रसंगी उपाशी राहूनही त्यांनी कोल्हापूर येथून कायद्याच्या पदवीपर्यंतचे शिक्षण घेतल्याचे सांगून ते म्हणाले, प्रचंड अपेष्टा सोसून स्वतःचे आयुष्य घडविणाऱ्या लोकनेते देसाई यांनी महाराष्ट्रात राबविलेल्या ई.बी.सी. योजनेने शिक्षणव्यवस्थेचे चरित्र आणि चारित्र्य बदलून टाकले. या योजनेमुळे राज्यातील बहुजन समाजातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येण्यास मोलाची मदत झाली. यामध्ये मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे जसे योदान होते, तसेच शिक्षणमंत्री म्हणून देसाई यांचेही योगदान राहिले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल त्यांना प्रचंड आदर होता. शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरातच व्हावे, या मागणीसाठी प्रसंगी मंत्रीपदाच्या राजीनाम्याची तयारी त्यांनी ठेवली होती. गेटवे ऑफ इंडिया, शिवाजी पार्क आणि प्रतापगड येथील महाराजांचे पुतळे हे त्यांनी उभारले. त्याकामी जनसहभाग मिळविण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. मुंबई-गोवा महामार्ग संकल्पित निधीपेक्षाही कमी खर्चात निर्माण करणारा त्यांच्यासारखा बांधकाम मंत्री विरळाच. शिक्षण, पाटबंधारे, महसूल, कृषी, सहकार आदी क्षेत्रांचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. तळागाळातील वंचित घटकांबद्दल प्रचंड आस्था असणारे देसाई आपल्या विरोधकांशीही समंजस व सुसंस्कृतपणे संवाद साधत असत.

ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी १९३० ते १९६० या कालखंडातील महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, १९६० नंतरचा महाराष्ट्र समजून घेण्यापूर्वी त्यापूर्वीचा महाराष्ट्र समजून घेणे आवश्यक आहे. गुजरात, कच्छ, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकाचा समावेश




असलेल्या व्यापक आणि गुजराती, मराठी व कन्नड अशा त्रैभाषिक मुंबई राज्याचा हा सारा पसारा होता. १९३०च्या आसपास महाराष्ट्रात काँग्रेसच्या बरोबरीने ब्राह्मणेतर, दलित, कामार इत्यादी चळवळींचा उदय झाला. टिळकपंथी नेतृत्वाचा प्रभाव कमी होऊन तळागाळातील नेत्यांचा उदय होऊ लागला. शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे आणि पुढे केशवराव जेधे यांचा प्रभाव काँग्रेसमध्ये वाढला. १९३५च्या कायद्याने १९३६ साली मुंबई राज्य विधानसभेची निर्मिती झाली. १९३७मध्ये पहिली निवडणूक झाली. काँग्रेसला ७८ जागा मिळून बाळासाहेब खेर मुख्यमंत्री झाले. त्यानंतर १९४६मध्ये पुन्हा खेरच मुख्यमंत्री झाले. १९५२ पर्यंत या सरकारवर गुजराती मंत्र्यांचे वर्चस्व होते. या मंत्र्यांचे कामकाज अतिशय निम्न दर्जाचे असून त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होती. त्यामुळे संसाधनांचे वाटप आव्हानात्मक बनले होते. १९४८मध्ये शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. १९५२मध्ये ३१४पैकी २६५ जागा काँग्रेसला मिळाल्या. यावेळी संयुक्त महाराष्ट्र, संयुक्त कर्नाटक आणि विशाल आंध्र चळवळी मूळ धरत होत्या. भाषावार प्रांतरचनेचा आग्रह तीव्र होत निघाला. शंकरराव देव यांनी या संदर्भात घेतलेल्या उलटसुलट भूमिकांमुळे त्यांचे नेतृत्व झुगारून देण्याच्या निर्णयापर्यंत काँग्रेस आली. मोरारजी देसाई यांना नवी मुंबई हे ४४ जिल्ह्यांचे मोठे राज्य हवे होते. उत्तर प्रदेशच्या तोडीचे हे राज्य त्यांना पंतप्रधान पदापर्यंत घेऊन जाण्यासाठी आवश्यक वाटत होते. मात्र, प्रत्यक्षात वातावरण निराळे असल्याने काँग्रेसमध्ये नेतृत्वाची नवी फळी उदयास आली. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्यासह लोकनेते बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, शंकरराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, गोपाळराव नाईक इत्यादींचा त्यात समावेश होता. अभ्यास करण्याची, अथक परिश्रम करण्याची तयारी असणाऱ्या या नेतृत्वाला जनतेच्या प्रश्नांचीही जाण होती. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्व मागे पडून नवे विकासाकांक्षी नेतृत्व महाराष्ट्रात या काळात उदयास आले, असे मत त्यांनी मांडले.

ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरूण भोसले यांनी १९६० ते १९८० या कालखंडाती महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाविषयी मांडणी केली. ते म्हणाले, हा कालखंड महाराष्ट्राच्या भरभराटीचा होता. सक्षम राजकीय नेतृत्वाचा हा उदयकाळ होता. या दोन्ही दशकांवर यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव होता, तर लोकनेते बाळासाहेब देसाई हे त्यांचे उजवे हात होते. कृषी-औद्योगिक संरचनेच्या स्वीकारामुळे राज्यात सहकार चळवळ निर्माण झाली, जी संपूर्ण देशासाठी आदर्श, मार्गदर्शक ठरली. ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा त्याने पालटून गेला. साहित्य, संगीत, नाट्य, विविध कला यांच्या ऊर्जितावस्थेचाही हा काळ होता. नवा महाराष्ट्र घडविण्याची या नवनेतृत्वाची आकांक्षा व जिद्द होती. यशवंतराव चव्हाण यांनी दूरदृष्टीने महाराष्ट्राच्या विकासाची पायाभरणी केली आणि राज्याला तशी ओळख प्रदान केली. लोकमान्य टिळक यांच्यानंतर राष्ट्रीय पातळीवर नावाजला गेलेला नेता म्हणजे यशवंतराव चव्हाण होत. लोकनेते देसाई यांच्याशी त्यांचे हृद्य संबंध होते. महाराष्ट्राच्या विकासकार्यात देसाई यांचेही त्यांना पूर्ण पाठबळ लाभले. महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार असलेल्या या जोडीला जनता सूर्य-चंद्र अगर राम-लक्ष्मण म्हणत असे. मात्र, देसाई यांनी जुलै १९७०मध्ये आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा का दिला, याची विश्वसनीय उकल आजही होत नाही. ते इतिहासात एक कोडे बनून राहिले आहे, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी ई.बी.सी. सवलतीच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रवाहात लाखो विद्यार्थ्यांना आणून डोंगराएवढे मोठे काम केले आहे. शिक्षणव्यवस्थेकडे ते सर्जनशील संवेदनशीलतेने पाहात होते. त्यातूनच कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ होण्यासाठी आग्रही राहणे, येथे गूळ संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय, तंत्रशिक्षण महाविद्यालय यांच्या उभारणीतून सर्वांगीण शिक्षणासाठीचा त्यांचा आग्रह दिसून येतो. राजकारण बाजूला ठेवून समाजकारण करणाऱ्या महाराष्ट्रीय नेतृत्वाच्या फळीतील ते एक आघाडीचे नेते होते. आदर्श नेतृत्वाचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिलेला आहे.

कार्यक्रमात सुरवातीला अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# दूरशिक्षण केंद्रात इतिहास स्वयंअध्ययन साहित्य निर्मिती कार्यशाळा

**कोल्हापूर, ( महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज)**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात बी.ए.भाग २ सत्र १ व २ च्या इतिहास विषयाच्या स्वयं अध्ययन साहित्य निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली.

इतिहास अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ.चंद्रवदन नाईक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, इतिहास स्वयं अध्ययन साहित्य गुणात्मक व आशयपूर्ण तयार करुन वेळेत जमा करावेत.

संचालक डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांना दर्जेदार व संशोधनात्मक स्वयं अध्ययन साहित्य देण्यासाठी घटक लेखकांनी प्रयत्न करावेत.ते तयार करताना मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.




उपकुलसचिव व्ही.बी.शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित घटक लेखकांना लेखनासाठी घटक वाटप करण्यात आले. शिवाय नव्याने तयार करण्यात आलेल्या एम. ए. भाग-२ सत्र ४ च्या 'आंतरराष्ट्रीय संस्थांचा इतिहास' या स्वयंअध्ययन साहित्याची प्रत घटक लेखक डॉ. संतोष जेठीथोर यांना डॉ. नाईक यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी डॉ. नितीन रणदिवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.मुफिद मुजावर यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज




# शिवाजी विद्यापीठात १२ व १३ मार्च रोजी पोर्तुगीज चित्रपट महोत्सव

**कोल्हापूर, ( महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज)**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि द कमॉइश इन्स्टिट्यूट, लिस्बन, पोर्तुगाल या दोन संस्थांमध्ये सामंजस्य करार झाला आहे. त्याअंतर्गत पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रमही सुरु करण्यात आला आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत दोन्ही संस्थांच्यात भाषा आणि संस्कृती या क्षेत्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे. त्यातून मराठी लोकांना पोर्तुगीज संस्कृतीचा परिचय करून होणार आहे. तसेच अभ्यासकांना मराठी इतिहासाच्या पोर्तुगीज भाषेतील नोंदींची माहिती होणार आहे.

याच सांस्कृतिक आदानप्रदानाचा एक भाग म्हणून दि. १२ व १३ मार्च या दोन दिवशी शिवाजी विद्यापीठात 'पोर्तुगीज चित्रपट महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी हॉलमध्ये दोन्ही दिवस दुपारी २.०० ते ६.०० या वेळेत चित्रपट प्रदर्शन होईल. या चित्रपट महोत्सवात काही महत्त्वाच्या विषयांवरील चित्रपट दाखवले जातील.

| | तारीख | वेळ दुपारी | चित्रपट | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | १२.०३.२०२५ | २.०० | द ब्लू ॲपल्स (२०२३) | निलांबरी हॉल, वनस्पतीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ. |
| २. | १२.०३.२०२५ | ४.०० | पुरेजा (२०२२) | निलांबरी हॉल |
| ३. | १३.०३.२०२५ | २.०० | साल्गेइरु माइया - द इम्प्लिकेटेड | निलांबरी हॉल |
| ४. | १३.०३.२०२५ | ४.०० | पोर्टो प्रिन्स (२०२३) | निलांबरी हॉल |

चित्रपट प्रदर्शनाचे उद्घाटन दि. १२ मार्च, २०२५ रोजी मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांच्या उपस्थितीत १.३० वा. निलांबरी हॉल येथे होणार आहे.

भारतीय वंशाच्या व्यक्तीशी विवाह करणारी पहिली पोर्तुगीज स्त्री एडिला गायतोंडे ही एक कार्यकर्ती, पियानो शिक्षिका, रेडिओ प्रस्तुतकर्ता आणि माहितीपट निर्माती होती. तिची कहाणी सांगणारा माहितीपट 'द ब्लू ॲपल्स (२०२३) अतिशय महत्त्वाचा आहे. तिचा पती पुंडलिक गायतोंडे हा सालाझारच्या हुकूमशाहीच्या काळात एक डॉक्टर, लेखक आणि वसाहतवादविरोधी लढणारा कार्यकर्ता होता. तो गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी लढला. एडिलाच्या जीवनाच्या दस्तऐवजातून अज्ञात गोवा आणि विस्मृतीत गेलेल्या पोर्तुगालच्या अनेक कथा प्रेक्षकांसमोर उलगडतात.

त्याचबरोबर स्वत:च्या तरुण मुलाच्या शोधात असतानाच जंगलांची अवैध वृक्षतोड आणि ग्रामीण मजुरांच्या शोषणाचा प्रश्न घेऊन लढणारी एकल माता पुरेजा, कॅप्टन साल्गेइरु माइया यांचा लोकशाहीसाठी संघर्ष आणि पोर्तुगाल व हैती या दोन भिन्न संस्कृतींना जोडत खऱ्या मैत्रीच्या नात्याचा अनुभव घेणारे बेर्था आणि बस्तीदी यांच्या कथा पोर्तुगाली संस्कृतीचा परिचय करून देतात.

हा पोर्तुगीज चित्रपट महोत्सव सर्वांसाठी खुला आहे. तरी या चित्रपट प्रदर्शनाचा लाभ घ्यावा व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदेशी भाषा विभाग करत आहे.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात १२ मार्चला शरण अध्यासनातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर ( महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज)**

शिवाजी विद्यापीठ येथील शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या औचित्याने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा बुधवार दि. १२ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पार पडणार आहे.

कार्यशाळेचा मुख्य विषय 'भारतीय महिला : जात-वर्ग-लिंगभाव जाणीव' हा आहे. यासाठी प्रमुख अतिथी म्हणून कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त मा. के. मंजूलक्ष्मी उपस्थित राहणार आहेत. तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के हे अध्यक्षस्थान भूषवतील. ई. एफ. एल. युनिव्हर्सिटि, हैद्राबादच्या माजी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. माया पंडित आणि सेंट्रल युनिव्हर्सिटि ऑफ कर्नाटका, गुलबर्गा येथील प्रा. डॉ. शिवगंगा रूम्मा या कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक असतील.

सदर कार्यक्रमात व्याख्याना सोबतच महिला विषयक निवडक आंतरराष्ट्रीय लघुपटांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. उमेश मालन दिग्दर्शित 'गोल्डन टॉयलेट' हा मराठी लघुपट, फजिल रझाक दिग्दर्शित 'पिरा' हा मल्याळम लघुपट तसेच समता जाधव दिग्दर्शित 'सोच सही, मर्द वही' हा हिंदी लघुपट दाखविण्यात येणार आहे. या लघुपटांविषयी डॉ. अनमोल कोठाडिया उपस्थितांशी संवाद साधतील.

या कार्यशाळेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विवेक वाहिनीचे विद्यार्थी,विद्यार्थिनी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. सदर कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन शरण साहित्य अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी आणि विवेक वाहिनी, कोल्हापूरच्या जिल्हा कार्यवाह डॉ. चैत्रा राजाज्ञा यांनी केले आहे.